PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Nau mahine nau divas
Year: 2009

Song: Nau Mahine nau divas
Lyricist: Guru Thakur

नऊ महिने नऊ दिवस
आनंद मावेना पोटात ओठात
झिम्माड मस्तीत नाचू चला
ए आनंद मावेना पोटात ओठात
झिम्माड मस्तीत नाचू चला
अंगात भिनला हा झंकार बेभान
धुमशान तालात डोलू चला
मंजुळ सनई ढणढण नगारा
बेधुंद झाला माहोल सारा
हृदयाच्या तालावर ढमढम ढोल वाजे
वाजे ढोल वाजे ढोल वाजे ढोल
वाजे ढोल

श्वास माझा तूच राजा
ध्यास मजला रे ना कुणाचा
या मनाची तूच राणी
तूच हृदयी या सातजन्मी
माझे जग हे डोळ्यात तुझिया
सुख हे दुसरे कोणते मजला
मंजुळ सनई ढणढण नगारा
बेधुंद झाला माहोल सारा
हृदयाच्या तालावर ढमढम ढोल वाजे
वाजे ढोल वाजे ढोल वाजे ढोल
वाजे ढोल

हे कृपाळा काय सांगू
देवराया रे काय मागू
आंधळा हा एक मागे
देव देई हो दोन डोळे
येईल किसना गोकुळी आता
विसरू दुःखे पाळणा हलता
मंजुळ सनई ढणढण नगारा
बेधुंद झाला माहोल सारा
हृदयाच्या तालावर ढमढम ढोल वाजे
वाजे ढोल वाजे ढोल वाजे ढोल वाजे ढोल
ये आनंद मावेना पोटात ओठात
झिम्माड मस्तीत नाचू चला
अंगात भिनला हा झंकार बेभान
धुमशान तालात डोलू चला
मंजुळ सनई ढणढण नगारा
बेधुंद झाला माहोल सारा
हृदयाच्या तालावर ढमढम ढोल वाजे
वाजे ढोल वाजे ढोल वाजे ढोल वाजे ढोल

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*